**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ४९ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -१६४** **दिनांक — १०/०६/२०२५**

**विभाग — बांधकाम विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय** — ई निविदा क्र. 1483 अ )अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील आयडीया सेल्युलर लि.पुणे या कंपनीने रस्ता खोदाई करिता भरलेल्या रकमेतून रस्त्याचे पॅचिंग करणे ब) अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील शहर व उपनगर भागातील रस्त्याचे पॅचिंग करणे या कामाची अनामत रक्कम परत मिळणे बाबत

--**--

**ठराव** — सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्तावित केले प्रमाणे बील फॉर्म मधील अ.क्र.१ ते ८ ची रक्कम अदयापपर्यत ठेकेदार संस्थेस अदा करण्यात आलेली नसून पैकी मा.मुख्यलेखाअधिकारी, अहिल्यानगर महानगरपालिका यांचे अभिप्राया नुसार रू. ९०,७२७/- व रू.३,६२,९०६/- वगळून रूपये ४८,५२७/-, रूपये १,०५,८८०/- , रूपये १,७१,६१८/-, रूपये ६,९८,४७०/-, रूपये १,९१,१०९/- रूपये ४,२३,५१८/-असे एकूण रक्कम रूपये १६,४५,१२२/- सदरची रक्कम व्यपगत झालेली रक्कम अदा करणेस प्रशासक सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
( **मेहेर लहारे** )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ४९ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -१६५** **दिनांक — १०/०६/२०२५**

**विभाग — नगररचना विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय —** RDSS योजने अंतर्गत नियोजित नविन 33/11 के.व्ही. विद्युत उपकेंद्र मौजे वाकोडी येथील 171पै, 172 पै मधील 0.40 आर जागा महावितरण यांना वितरित करणे बाबत

--**--

**ठराव —** विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार अतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्थापत्य ) स्थापत्य उपविभाजन महावितरण अहिल्यानगर यांचेकडील पत्र अ.का.अ (स्था)बां.वि.सु. उपवि/ अ.नगर /ता.नं.०११७१ दि. ११/१२/२०२४ रोजीचे पत्रान्वये कार्यकारी अभियंता (सं व सु )रामग्रा विभाग अहिल्यानगर यांनी RDSS योजने अंतर्गत नियोजित नविन ३३/१ के.व्ही. विदयुत उपकेंद्रासाठी अहिल्यानगर महानगरपालिका या नियोजित एस.टी.पी बाबत बुरूडगांव परिसरातील वाकोडी या ठिकाणाची शिल्लक क्षेत्र मिळणेबाबत विनंती केलेली आहे. मा.सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांनी जा.क्र. २०५१ दि.०७/०२/२०२५ रोजीचे पत्रान्वये बुरूडगांव येथील नियोजीत एस.टी.पी.क्षेत्र किती आहे तसेच किती जागा शिल्लक आहे. व RDSS योजने अंतर्गत नविन ३८/११ केव्ही विद्युत उपकेंद्रासाठी महावितरणला भाडेतत्वावर जागा देणे बाबत अभिप्राय मागितलेला आहे. सदर ठिकाणी एस.टी.पी. व इतर प्रयोजन व्यतिरिक्त किती जागा शिल्लक आहे. याचा तपशिल कळविल्यास महावितरणाला जागा भाडेतत्वावर देणे बाबत नगररचना विभागाला अवगत करता येईल असे कळविलेले आहे.

याबाबत जलअभियंता यांनी फ-याबाग एसटीपी प्लॅट येथे सौरउर्जा प्रकल्प उभारणेकरिता साधारण ४ एकर, भुयारी गटर योजना टप्पा-२ योजने करिता १८ द.ल.ली.क्षमतेचा एसटीपी व ६३४ केडब्यू पी क्षमतेचा सोलर प्लॅट करिता साधारणपणे ३५० एकर, कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ,अहिल्यानगर यांनी उपलब्ध जागेपैकी किती जागा देवू शकता याबाबत मनपा स्तरावर निर्णय घेण्यात यावा असे कळविलेले आहे.

तरी मौजे वाकोडी येथील एसटीपी मनपाच्या मालकीचे मलःनिस्सारण केंद्रासाठी राखीव असलेले सुमारे अंदाजे १७ एकर क्षेत्र रेकॉर्ड नुसार दिसून येते परंतु प्रत्यक्षात टोटल सर्व्हेक्षण करून त्यानुसार १५ ते १६ एकर प्रत्यक्षात दिसून येते. त्यामध्ये सोबतचा नकाशा जोडल्याप्रमाणे अमृत भुयारी गटर योजना टप्पा-१ करित ०४ एकर व भविष्यात होणा-या भुयारी गटर योजना टप्पा-२ करिता ०४ एकर असे ०८ एकर क्षेत्र यामध्ये लागणार आहे. त्याचबरोबर पाणीपुरवठा विभागामार्फत झालेले सोलर प्रोजेक्टसाठी सुमारे २५ एकर क्षेत्र असे मिळून सुमारे १२ एकर क्षेत्र व्यापलेले आहे. उर्वरित क्षेत्रामध्ये जुने परंतु निर्लेखन करून पाडणे बाकी आहे परंतु त्या ठिकाणी भविष्यामध्ये काही

सोलर प्रोजेक्ट किंवा इतर शहरात न करण्याजोगे प्रकल्प उदाहरणार्थ कत्तलखाना किंवा इतर तत्सम प्रकल्प करता येणे योग्य आहे. तसेच त्यापैकी काही ठिकाणी हरित पट्टे देखील विकसीत केलेले आहे.

तरी विभागाने प्रस्तावात नमुद केल्या प्रमाणे विद्युत पारेषण विभागाला महानगरपालिकेच्या प्लॉट मधील एका कोप-यामध्ये ४० गुंठे जागा देण्यास प्रशासक सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे. नगररचना विभागाने मोबदल्या बाबत नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी. तथापी विद्युत पारेषण विभागाला जागा आगाऊ ताब्यात देणे बाबत कार्यवाही करावी.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
( **मेहेर लहारे** )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ४९ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -१६६** **दिनांक – १०/०६/२०२५**

**विभाग – नगररचना विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय –** मौजे नागापूर जुना स.नं.130/1 नविन स.नं.28/1 ची जागा औरंगाबाद खंडपिठ यांचे आदेशा प्रमाणे संपादित करणे बाबत

--**--

**ठराव –** विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार मौजे नागापूर येथील स.नं. १३० चा सन १९४०- ४१,४२ चा ७१२ उतारा पहाता सदरची जलागा ही एकूण क्षेत्रफळ ६ एकर ३८ गुंठे सरकारी गुरे चारणी कडे दर्शविलेली दिसून येते. भुमी अभिलेख खात्याकडील आकारबंदाची नक्कम पहाता स.नं.१३० चे एकूण क्षेत्रफळ २ हे.८१ आर दर्शविलेले आहे.

सदर जमिनीचे ६ एकर ३८ गुंठे क्षेत्र श्री फकीरा शंकर लोखंडे यांना सन १९६३ साली वाटप करणेत आलेले आहे. तसेच सदर जमिनीचे इतर हक्कात त्यावेळेस फॉरेस्ट जमिन व नविन शर्त असा शेरा घेतलेला आहे.

मौजे नागापूर जुना स.नं.१३०/१ नविन स.नं.२८/१ ची जागा अदला-बदलीने उपविभागीय अधिकारी नगर भाग नगर यांचे कडील दि.१७/०१/२००५ चे आदेशान्वये श्रीमती वर्षा बाळासाहेब सोनवणे यांना स.नं.१३० पैकी मिळालेले क्षेत्र २ हे ७० आर जमीन अदल बदल केली असा शेरा नमुद केलेला आहे.

त्याप्रमाणे सौ.वर्षा बाळासाहेब सोनवणे व श्री फकिरा शंकर लोखंडे यांनी दुय्यम निबंधक वर्ग २ अहमदनगर दक्षिण यांचेकडील दस्त क्रमांक ५८१/२००५ दि.११/०२/२००५ अन्वये अदलाबदल लेख नोंदविलेला आहे.

फेरफार क्रमांक ८४३२ मध्ये स.नं.१३० क्षेत्र २ ८१ आर या पैकी मातंग व महानुभव पंथ यांचे स्मशानभूमी क्षेत्र ०११ आर वगळून उर्वरित २.७० आर जमिन बदलाबदल केली असा शेरा नमुद केलेला आहे. फेरफार क्रमांक ८४३२ प्रमाणे खालील प्रमाणे वाटण्या केल्या आहेत.

| स.नं. | क्षेत्र हे. आर. | आकार | कब्जेदार |
|---|---|---|---|
| १३०/१ | २७० | १३.०० | सौ.वर्षा बाळासाहेब सोनवणे |
| १३०/२ | ०.११ | वरील प्रमाणे | फकिरा शंकर लोखंडे |

वरील सर्व्हे नं. पैकी स.नं. १३०/२ हा स्मशानभूमीचे क्षेत्रचा असलेने वाटण्या पडल्या आहे.

उपविभागीय अधिकारी नगर भाग नगर यांचे आदेशात जमीनीवर वर्ग २ च्या पूर्वी च्या सर्व अटी बंधनकारक राहतील व त्याचप्रमाणे जमीनीचे ७/१२ व इतर हक्कात नविन शर्त अशी नोंद घेणे अशी अट नमुद केलेली आहे.

उपरोक्त विषया बाबत संदर्भ क्रमांक १ अन्वये सौ.वर्षा बाळासाहेब सोनवणे यांनी इकडेस अर्ज केलेला आहे. मौजे नागापूर येथील जुना स.नं. १३०/१ नविन स.नं. २८/१ ची जागा औरंगाबाद खंडपिठ यांचे आदेशाप्रमाणे संपादित करणे बाबत कळविणेत आलेले आहे.

याबाबत सादर करणेत येते की, मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिटपिटीशन क्रमांक ६९३६/२०१४ मधील सिव्हील ॲप्लीकेशन क्रमांक ६८२८/२०२४ मध्ये दिनांक ९/८/२०२४ रोजी निर्णय पारित झालेला आहे.

मौजे नागापूर येथील जुना स.नं. १३०/१ नविन स.नं.२८/१ ची जागा श्रीमती वर्षा बाळासाहेब सोनवणे व इतर यांचे मालकीची असून सदर सर्व्हे मध्ये स्मशानभूमी /दफनभूमी असलेमुळे अहिल्यानगर महानगरपालिकेने भूसंपादन करून त्याची नुकसान भरपाई मिळणे बाबत दावा दाखल करणेत आलेला होता.सदर दाव्यातील निर्णया नुसार मौजे नागापूर येथील उपरोक्त सर्व्हे नंबरची मोजणी उपअधिक्षक भूमी अभिलेख यांनी मोजणी करून सदर मोणजीची प्रत वादी यांनी महानगरपालिकेस पुरविल्यानंतर महानगरपालिकेने सदर सर्व्हे नंबर पैकी किती जागा स्मशानभूमीसाठी /दफनभूमीसाठी आवश्यक आहे हे निश्चत करून त्याबाबत भू-संपादनाची कार्यवाही मोजणी नकाशा मिळाले नंतर साठ दिवसात करणेत यावी असे निर्णयात नमूद केलेले आहे. तसेच सदर संपादनाची कार्यवाही विहीत केलेल्या मुदतीत भुसंपादन अधिनियम २०१३ प्रमाणे करणे बाबत नमुद केलेले आहे.

वरिल विषयाच्या अनुषंगाने अर्जदार यांनी संदर्भिय अर्जा सोबत शासकीय मोजणीचा नकाशा इकडेस सादर केलेला आहे.नागापूर येथील स.नं. २८/१ चे एकूण क्षेत्र चालू ७१२ उता-याप्रमाणे २ हेक्टर ७० आर असून ऐवढे असून सदर मोजणी नकाशा मध्ये स्मशानभूमी /दफनभूमी दर्शविणेत आलेले नाही. नागपूर येथील विकास योजनेचा नकाश पहाता त्यामध्ये स.नं. २८१ यामध्ये विद्यमान स्मशानभूमी /दफनभूमी दर्शविण्यात आलेली आहे. दक्षिण बाजूस नगर मनमाड हायवे असून सदर सर्व्हे नंबराचा काही भाग रस्त्याच्या पलिकडे येत आहे.तसेच पुर्वेस सिनानदी असल्याने काही त्याचा काही भाग हा ग्रिन बेल्ट मध्ये दर्शविणेत आलेला आहे व या सर्व्हे नंबर मध्ये विकास आराखडयात आरक्षण क्रमांक २० ने सार्वजनिक शौचालय ०.२५ आर असे दर्शविलेले आहे.

सदर सर्व्हे नंबर हा चिंचोळा असून त्याची लांबी जास्त असलेने मोजणी नकाशाची प्रत १:१००० ऐवजी १:२००० मध्ये दर्शविणेत आलेला असून त्यामध्ये विद्यमान स्मशानभूमीचे क्षेत्र दर्शविणेत आलेले नाही. सदर सर्व्हे नंबर मध्ये अंदाजित १.०० हेक्टर क्षेत्रामध्ये हिंदू स्मशानभूमी , मुस्लीम कब्रस्तान व महानुभव पंथ दफनभुमी व ख्रिश्चन दफनभुमी आहे. सदर सर्व्हे नंबरचा दक्षीणेकडील रस्त्याच्या पलीकडील भाग हा नदीपात्रात वाहून गेलेला आहे. त्यामुळे सदर जागेची संपादना करीता आवश्यकता नाही. उत्तरेकडील काही भाग हा गावठाणा लगत असून ती जागा सध्या मोकळी आहे.

स.नं. २८/१ चे एकूण २ हे ७० आर क्षेत्रापैकी संदर्भ क्रमांक ४ अन्वये ०२० आर एवढे क्षेत्र संपादन करणेस मंजूरी देणेत आलेली आहे. त्यानुशंगाने ०२० आर ऐवढे क्षेत्र संपादित करावे लागणार आहे. तरी सदर क्षेत्रापैकी संपादित होणा-या क्षेत्रास भुसंपादन अधिनियम २०१३ प्रमाणे संपादित क्षेत्र् व सदर क्षेत्राचा आजचा रेडीरेकनरचा दर X२.२५ एवढी रक्कम संबंधीतांना अदा करावी लागणार आहे. सन २०२५-२६ रजिष्ट्रार ऑफिस यांचेकडील मंजूर दर खालील प्रमाणे आहे.

| स.नं. | संपादित करावयोच एकूण क्षेत्र | रेडीरेकनरचा हेक्टरी दर | संपादित क्षेत्राची किंमत |
|---|---|---|---|
| जुना १३०/१<br>नविन २८/१ | ०.२० आर | २८,७१,०००/- | ५,७४,२००/- |

सदर संपादन क्षेत्राची जमीनीची किंमत येत असून भुसंपादन अधिनियम २०१३ प्रमाणे येणा-या जमीनीच्या किंमतीच्या १०० टक्के दिलासा रक्कम ५,७४,२००/- असे एकूण ११,४८,४००/- असून त्यावर वाढीव मोबदला २५ टक्के २,८७,१००/- असे एकूण रू.१४,३५,५००/- एवढी रक्कम संबंधीतांना अंदाजित अदा करावी लागणार आहे.

तरी सदर जमिनी बाबत खालील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१) सदर जमीनीतील काही भाग ग्रीनबेल्टचा असून सार्वजनिक शौचालयासाठी आरक्षीत आहे त्याचा आरक्षण क्रमांक

आहे त्याचे एकूण क्षेत्रफळ ०.२५ आर आहे

2)सदर जमीन ही वर्ग – १ ची असून नविन शर्तीची आहे. तरी संबंधीतांना संपादित जमिनीची रक्कम अदा करते वेळेस या बाबत नियमानुसार संपादित जमिनीची रक्कम शासन निर्णय क्रमांक /जमीन - २०१५/प्र.क्र.८७/ ज-१अ मुंबई दिनांक ११ जानेवारी २०१७ मधील परिच्छेद २ मध्ये संपादित करणेत येत असलेल्या किंवा खाजगी वाटाघाटीने संपादित करणेत येत असतील तर अशा समयी अशा जमिनीच्या निश्चित केलेल्या मोबदल्याच्या १० टक्के इतकी रक्कम नजराणा म्हणून वसुल करणेत यावी असे नमुद केले आहे.

नगररचना विभागाने प्रस्तावित केल्यानुसार कार्यवाही करावी, तसेच संपूर्ण क्षेत्र संपादित, करणेबाबत कार्यवाही करावी. परंतु सदर जागेर्पेकी काही जागा हि नदिपात्रात वाहून गेलेली आहे. काही जागा गावठाण लगत मोकळी आहे. सदर जागेची मोजणी करून नगररचना विभागाने पुढिल कार्यवाही करावी

जागा संपादितबाबतचा मोबदला संबंधितीस देण्यास व खर्चास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजुरी देत आहे. नगररचना विभागाने सदर बाबत योग्य ती उचित कार्यवाही करावी.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| ( **मेहेर लहारे** ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |